कार्यासनाशी संबंधित विषयांबाबत अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रकरणे सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांचे तीन स्तर निश्चित करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
कार्यालयीन आदेश क्र. आयएफएस २०१७/ प्र.क्र. २८२ / फ-७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १२ सप्टेंबर,२०१७

<u>वाचा</u> : १. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही २००४/ प्र.क्र. १५/०४/१२ दिनांक २५.०५.२००६

२. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र. पीओडी १००७/ प्र.क्र. ९/१८ (र.व का.) दिनांक १४.११.२०१४

३. शासन परिपत्रक , सामान्य प्रशासन विभाग क्र. संकिर्ण २०१२/ प्र.क्र. ५४/१८ (र. व का.) दिनांक ११.०८.२०१४

आदेश :-

महाराष्ट्र शासकीय बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५ दि. २५.५.२००६ च्या अधिसूचनेव्दारे प्रसिध्द करण्यात आला आहे. तसेच सदर अधिनियमांतर्गत " महाराष्ट्र शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध नियम,२०१३," दि. १४.११.२०१३ च्या अधिसूचनेव्दारे राज्यात लागू करण्यात आला आहे. सदर अधिनियमाच्या कलम ९ (१) व ९ (२) अन्वये प्रत्येक विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी त्यांना दुय्यम अधिकाऱ्यास अंतिम निर्णय घेण्यासाठी शक्ती प्रदान करावयाच्या आहेत. तसेच विभागाशी / कार्यालयाशी संबंधित सर्व बाबींवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रकरणे सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांचे तीन स्तर निश्चित करण्याचे निदेश दिले आहेत.

त्या अनुषंगाने फ -७ कार्यासनाशी संबंधित विषयाच्या बाबतीत सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे निर्णय घेण्यासाठी सादरीकरणाचे स्तर निश्चित करण्यात येत आहेत. तथापि, वरिष्ठ अधिका-यांचे निदेश असल्यास किंवा काही विशिष्ट अपवादात्मक प्रकरणी आवश्यकता भासल्यास प्रकरणपरत्वे त्यामध्ये योग्य तो बदल करण्यात येईल. तसेच धोरणात्मक बाबींच्या प्रकरणात दिनांक ११.०८.२०१४ च्या परिपत्रकात नमुद केल्यानुसार सादरीकरणाचे तीन पेक्षा अधिक स्तर असतील.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१२१४१६३४०४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2017.09.12 14:06:51 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत :

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अप्पर मुख्य सचिव
२. मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३. मुख्य सचिव यांचे उपसचिव
४. अप्पर मुख्य सचिव (प्र.सु. व र.व का.), सा.प्र.वि. यांचे स्वीय सहायक
५. प्रधान सचिव (महसूल),महसूल व वन विभाग यांचे स्वीय सहायक
६. सचिव (वने), महसूल व वन विभाग यांचे स्वीय सहायक
७. महसूल व वन विभाग, वन विभागातील सर्व कार्यासने
८. निवड नस्ती

(कार्यालयीन आदेश क्र आयएफएस २०१७/ प्र.क्र.२८२/ फ-७, दि.१२ सप्टेंबर,२०१७ सोबतचे विवरणपत्र)

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५ मधील कलम ९(१) व ९(२) अंतर्गत कार्यासनाशी संबधित बाबींवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रकरणे सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांचे तीन स्तर निर्धारित करणे .

अ. क्र.	विषय	स्तर			अंतिम निर्णय घेण्यास सक्षम प्राधिकारी	आदेश/ प्रमाणपत्र निर्गमित करण्यास सक्षम अधिकारी
		प्रथम	व्दितीय	तृतीय		
१	२	३	४	५	६	७
१	राज्य शासन सेवेतून भारतीय वन सेवेमध्ये पदोन्नती तसेच अखिल भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांच्या सेवेतील पुढील पदोन्नती बाबतचे प्रस्ताव	अवर सचिव	मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)	सचिव/ प्रधान सचिव / अप्पर मुख्य सचिव (वने)	मा. मुख्यमंत्री	मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)/ अवर सचिव
२	भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांच्या सेवेतील नियुक्त्या व बदल्यांबाबचे प्रस्ताव	अवर सचिव	मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)	सचिव/ प्रधान सचिव / अप्पर मुख्य सचिव (वने)	मा. मुख्यमंत्री	मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)/ अवर सचिव
३	१५/२५ वर्षे सेवा कालावधीनंतर व वयाच्या ५०/५५ व्या वर्षी भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांना सेवेत चालू ठेवण्याबाबतचे पुनर्विलोकन बाबतचे प्रस्ताव	अवर सचिव	मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)	सचिव/ प्रधान सचिव / अप्पर मुख्य सचिव (वने)	मा. मुख्यमंत्री	मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)/ अवर सचिव

४	भारतीय वन सेवा अधिकाऱ्यांच्या संवर्गाचा पंचवार्षिक आढावा	अवर सचिव	मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)	सचिव/ प्रधान सचिव / अप्पर मुख्य सचिव (वने)	मा. मुख्यमंत्री	मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)/ अवर सचिव
५	भारतीय वन सेवा अधिकाऱ्यांचे विभागीय चौकशी बाबतचे प्रस्ताव / मा. न्यायालयामध्ये अभियोग दाखल करणे बाबतचे प्रस्ताव तसेच त्यानुषंगाने उद्भवणारे निलंबनाबाबतची प्रकरणे	अवर सचिव	मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)	सचिव/ प्रधान सचिव / अप्पर मुख्य सचिव (वने)	मा. मुख्यमंत्री	मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)/ अवर सचिव
६	भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांच्या आंतर संवर्ग बदल्या, जन्म दिनांकामधील बदल, स्थायीकरण, प्रतिनियुक्ती, Empanelment चे प्रस्ताव, वाटप वर्षे निश्चिती बाबतचे प्रस्ताव इत्यादी	अवर सचिव	मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)	सचिव/ प्रधान सचिव / अप्पर मुख्य सचिव (वने)	मा. मुख्यमंत्री	मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)/ अवर सचिव
७	अधिसंख्य पद निर्मीती	कक्ष अधिकारी	मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)	सचिव/ प्रधान सचिव / अप्पर मुख्य सचिव (वने)	मा. मंत्री (वने)	मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)/ कार्यासन अधिकारी
८	भारतीय वन अधिकाऱ्यांचे विदेश प्रशिक्षण, अभ्यास दौरा	कक्ष अधिकारी	मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)	सचिव/ प्रधान सचिव / अप्पर मुख्य सचिव (वने)	मा. मंत्री (वने)	मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)/ कार्यासन अधिकारी

८	भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांच्या आस्थापना विषयक संकीर्ण बाबी जसे भनिनि, घरबांधणी अग्रिम मंजूरी,गट विमा योजना प्रकरणे, नियमित सेवा निवृत्तीचे प्रकरणे, रजा विषयक बाबी, वैद्यकीय प्रतिपूर्ती, विमान प्रवास, सेवा विषयक बाबींच्या अनुषंगाने उद्भवणारी न्यायालयीन प्रकरणे इत्यादी	कक्ष अधिकारी	मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)	सचिव/ प्रधान सचिव / अप्पर मुख्य सचिव (वने)	सचिव/ प्रधान सचिव / अप्पर मुख्य सचिव (वने)	मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)/ कार्यासन अधिकारी